# Dr. Panjabrao Deshmukh Hostel Maintenance Allowance – OPEN/EWS

## First Year MBBS Students

## (ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्याची प्रक्रिया)

## Hostel Details

डॉ. पंजाबराव देशमुख योजनेला अप्लाय करण्यासाठी विद्यार्थ्यांनी सर्वप्रथम **Profile** मध्ये जाऊन **Hostel Details** मध्ये **Hostel Type – Non Govt.** दाखवून चालू शैक्षणिक वर्षाचे महाविद्यालयाचे मूळ वसतिगृह प्रमाणपत्र (Original Hostel Certificate) स्कॅन करुन अपलोड करणे अनिवार्य आहे. **(वसतिगृह शुल्काची पावती अपलोड करु नये)** **किंवा** विद्यार्थी जर भाडेतत्त्वावर/किरायाने (Rent) रहात असेल तर **Hostel Type – Rented House** दाखवून रु. १००/- च्या बॉण्डवर चालू शैक्षणिक वर्षाचे शपथपत्र (भाडे करारनामा) ॲफिडेव्हिट/नोटरी करुन अपलोड करणे अनिवार्य आहे.

↓

त्यानंतर सर्वात शेवटी विद्यार्थ्यांनी All Schemes मध्ये जाऊन Directorate of Medical Education and Research या विभागाची निवड करावी व Dr. Panjabrao Deshmukh Hostel Maintenance Allowance या योजनेची निवड करावी.

Scheme ची निवड केल्यानंतर विद्यार्थ्यांना खालीलप्रमाणे Additional Questions विचारण्यात येतील.

i) Is this a Renewal Application – No करणे.
ii) Upload Father/Guardians PAN Card (Compulsory)
iii) Upload Father/Guardians Aadhaar Card (Compulsory)
iv) Upload Mother/Guardians Aadhaar Card (Compulsory)
v) Upload Mother PAN Card (Optional)
vi) Upload Students PAN Card (Optional)
vii) is your parents are Alpabhudarak Shetkari ? **( Alpabhudarak Shetkari प्रमाणपत्र नसेल तर No करणे किंवा असेल तर Yes करुन तहसील कार्यालयाकडून मिळालेले original अल्पभूधारक प्रमाणपत्र अपलोड करणे व अर्जासोबत जोडणे )**

**किंवा**

is your parents are Registered Labour ? **( Registered Labour प्रमाणपत्र नसेल तर No करणे किंवा असेल तर Yes करुन तहसील कार्यालयाकडून मिळालेले original भूमिहीन शेतमजूर असल्याचे प्रमाणपत्र अपलोड करणे व अर्जासोबत जोडणे )**

**वरील प्रमाणे कागदपत्रे अपलोड केल्यावर सर्वात शेवटी अर्ज SAVE करुन SUBMIT करणे अनिवार्य आहे, त्यानंतर विद्यार्थ्यांना Scheme Successfully Apply केल्याचा SMS येईल, तेव्हाच ऑनलाईन अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण होईल. त्यानंतर विद्यार्थ्यांनी My Applied Scheme मध्ये जाऊन View Form मध्ये जाणे आणि अर्जाची प्रिंट घेणे आणि खालीलप्रमाणे विहित नमुन्यातील अर्ज ( Application to Dean ) लिहून अर्जावर नमुद केलेली कागदपत्रे क्रमाने अर्जासोबत जोडून कार्यालयात जमा करणे अनिवार्य राहील.**

↓

प्रथम वर्ष **MBBS** साठी विहित नमुन्यातील अर्ज ( Application to Dean )

दिनांक :-

प्रति,
मा. अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
जालना.

विषय :- डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना मंजूर करणेबाबत...

महोदय,

उपरोक्त विषयी सविनय अर्ज करतो/करते की, मी आपल्या महाविद्यालयात प्रथम वर्ष MBBS या अभ्यासक्रमात शिक्षण घेत आहे.

मी विषयांकित योजनेसाठी महाराष्ट्र शासनाच्या MAHA-DBT पोर्टलवर ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर केला असून, अर्ज सादर करतेवेळी अत्यावश्यक असलेली सर्व प्रमाणपत्रे स्पष्ट दिसतील अशाप्रकारे अपलोड केलेली आहे.

त्याचप्रमाणे अर्जात नमूद केलेली कौटुंबीक उत्पन्नाची माहिती, इतर माहिती योग्य आहे, त्याचप्रमाणे अर्जासोबत जोडलेली कागदपत्रे ही मूळ कागदपत्रांच्याच सत्यप्रती आहेत, जर ही माहिती खोटी आढळल्यास त्यास मी पुर्णतः जबाबदार असेन, त्यासाठी भा.दं.वि.कायदा कलम १९९ व २०० नुसार लागु होणा-या शिक्षेस मी पात्र राहील, याची मला पुर्ण जाणीव आहे.

करीता माझा अर्ज मंजूर करावा ही नम्र विनंती...

आपला/आपली आज्ञाधारक
Sign,-
Name -
Admission Year –
Roll No. -

सोबत :- Self Attested Documents

१) ऑनलाईन अर्जाची प्रिंट - हार्डकॉपी ( Hard Copy)
२) अधिवास प्रमाणपत्र (Domicile certificate) - Xerox
३) EWS Certificate - Xerox (केवळ EWS प्रवर्गातुन प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांसाठी)
४) विद्यार्थ्याचे आधार कार्ड - Xerox
५) पालकाचे आधार कार्ड - Xerox
६) पालकाचे पॅन कार्ड - Xerox
७) उत्पन्न प्रमाणपत्र - Xerox
८) तहसील कार्यालयाकडून प्राप्त झालेले अल्पभूधारक प्रमाणपत्र - **Original** (असेल तर )
९) तहसील कार्यालयाकडून प्राप्त झालेले भूमिहिन शेतमजूर प्रमाणपत्र - **Original** (असेल तर )
१०) गतवर्षी पास झालेल्या परिक्षेच्या गुणपत्रिका - Xerox ( Last Year Marksheet )
उदा. १० वी, १२ वी
११) गॅप असेल तर रु. १०० च्या बॉण्ड पेपर वर गॅप बाबत शपथपत्र.- Xerox
१२) CAP id (College Allotment letter) - Xerox
१३) Current Year Original College Hostel certificate किंवा रु. १०० च्या बॉण्ड पेपरवर भाडे करारनामा (Original) (जे विद्यार्थी राजर्षी छत्रपती शाहु महाराज योजना आणि डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह योजना असे दोन्ही अर्ज भरणार असतील फक्त त्यांच्यासाठी )
१४) First Year Bonafide Certificate - Xerox
१५) कॉलेज Office order आणि Holding Certificate - Xerox